# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०६/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा दि. २०/०६/२००५ रोजी सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०२ दि. १०/०६/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, तिसरा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. पाटील मोहन मधुकर | सभापती, स्थायी समिती |
| ३) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सभागृह नेता |
| ४) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सभापती, महिला बालकल्याण |
| ५) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | उप-सभापती,महिला बालकल्याण |
| ६) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ७) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | सदस्य |
| ८) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सदस्य |
| ९) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १०) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| ११) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १२) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १३) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १४) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १५) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १६) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १७) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १८) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १९) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २०) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २१) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २२) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २३) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २४) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २५) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २६) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २७) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २८) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २९) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३०) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ३१) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३२) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३३) | श्री. आत्माराम बाळाराम गावंड | सदस्य |
| ३४) | श्रीम. पाटील अनिता जयंत | सदस्या |
| ३५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३६) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ३७) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ३८) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ३९) | श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४०) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४१) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४२) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ४३) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४४) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |
| ४५) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४६) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ४७) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ४८) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ४९) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५०) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५१) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५२) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ५३) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ५४) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ५५) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ५६) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ५७) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ५८) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ५९) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ६०) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ६१) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ६२) | श्री. जैन रमेश धरमचंद्र | सदस्य |
| ६३) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | नामनिर्देशित सदस्य |
| ६४) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ६५) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ६६) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ६७) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## <u>गैरहजर सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| २) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ३) | श्री. नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| ४) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | सदस्य |
| ५) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ६) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ७) | श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट | सदस्या |
| ८) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ९) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| १०) | श्री. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ११) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| १२) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| १३) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| १४) | श्री. म्हात्रे तुळशीदास दत्तू | सदस्य |

## रजेचा अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| २) | श्री. मेंडोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ३) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |

वरीलप्रमाणे महासभेकरिता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार वंदे मातरम् राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

नमस्कार. मा. उपआयुक्त श्री. रणखांबसाहेब, मा. स्थायी समिती सभापती श्री. मोहन पाटीलसाहेब, सभागृहनेते श्री. लिओ कोलासोसाहेब, सर्व पक्षाचे गटनेते, महिला बालकल्याण समिती सभापती श्रीम. जेन्वी अल्मेडा मॅडम, सर्व प्रभाग समितीचे अध्यक्ष, प्रभाग समितीचे सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, महापालिका सचिव श्री. हरेश पाटीलसाहेब, सर्व मान्यवर अधिकारी, सर्व वृत्तपत्राचे प्रतिनिधी आणि प्रेक्षक गॅलरीत उपस्थित असलेले सर्व नागरिक बंधु-भगिनी. कडक उन्हाळयाने जीवाची काहिली होत होती. ब-याच दिवसाच्या प्रतिक्षेने वरुण राजाने कृपादृष्टी करुन आपली हजेरी लावल्याने नागरिकांना सुखद अनुभवाची अनुभती येत आहे. कडक उन्हाळयात संपूर्णतः रिमझिमत्या पावसाच्या सरी घेतेवेळी आपली ही महासभा होत आहे. सदर सभेसाठी मी आपणा सर्वांचे मनःपूर्वक हार्दिक स्वागत करते. दरवर्षी एप्रिल, मे महिन्यात सगळीकडे पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य असते. आपले मिरा भाईंदर त्यात काही अपवाद नव्हते. मात्र पाणीपुरवठा नियमित व वीजपुरवठा नियमित व्हावा आणि पावसाळयापूर्वी शहरात झालेली रस्त्याची डागडुजी, नालेसफाई, गटाराची सफाई त्यामुळे आजच्या सभेस सामोरे जाताना बरे वाटत आहे. म्हणून आजच्या सभेत सर्वांनी तेवढयाच प्रसन्नतेने भाग घ्यावा आणि सभा यशस्वी करण्यास मला सहकार्य करावे अशी आपणास विनंती आहे. आजच्या सभेच्या कामकाजात प्रश्नोत्तर, नियमित विषय व 'ज' चे प्रस्ताव विचारात घेण्यात येणार आहेत. तसेच सभेच्या समारोपाच्यावेळी दिवंगत नामदार सुनील दत्तसाहेब केंद्रीय क्रिडा मंत्री यांच्या निधनाबद्दल दुःखवटयाचा ठराव घेण्यात येणार आहे. तसेच, लवकरच बारावीतील यशस्वी, गुणवंत विद्यार्थी आणि इयत्ता दहावीचा निकाल येत्या दि. २४ जून रोजी जाहिर होणार आहे. त्या निमित्ताने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून परिक्षा दिलेल्या सर्व विद्यार्थ्यांना निकालाच्या हार्दिक शुभेच्छा. या परिक्षेत जास्तीत जास्त विद्यार्थी उत्तीर्ण होउन मिरा भाईंदर क्षेत्रातून गुणवंत यादीत जास्तीत जास्त विद्यार्थी यावेत अशी इच्छा व्यक्त करते. या निकालानंतर दहावी आणि बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा महापालिकेच्या वतीने सत्कार करण्यात येणार आहे. आपल्या सर्वांचे पुनश्च हार्दिक स्वागत. धन्यवाद. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**रोहिदास पाटील :-**

कामकाजाला सुरुवात करण्यापूर्वी मला या ठिकाणी एक गोष्ट सांगावीशी वाटते की मा. महापौरांनी आता जे निवेदन केले. त्या निवेदनाबद्दल काही तक्रार असण्याचे कारण नाही. परंतु, एक कर्तव्याची जाणीव म्हणून मी जाणीव करुन देतो की सभागृहाचे कामकाज व्यवस्थित चालण्याच्या दृष्टिने सांगावेसे वाटते की उन्हाळा संपून आता पावसाला सुरुवात होणार आहे. पावसाची चाहुल लागलेली आहे. वातावरण थंड होत चाललेले आहे. आपले कामकाज थंड करता येणार नाही. आपले कामकाज नव्या दमाने, नव्या उमेदीने चालवायला पाहिजे. आपली ही जी महासभा आहे. त्या सभेची वेळ सकाळी ११.०० वाजताची असतानासुध्दा ही सभा ११.४५ वाजता सुरु होते. आम्ही तुमचा सन्मान करतो. आम्ही त्याच्यात स्वतःलाही आपला सन्मान राखण्यामध्ये धन्य समजतो. परंतु, ही कामकाजाची पध्दत नाही. हे आपल्या निदर्शनास आणून देतो. यापुढे हया सभेचे कामकाज हे सभेच्या वेळेनुसार होणे अपेक्षित आहे. हयाची आपण जाणीव ठेवावी.

**प्र. सचिव :-**

आता ११.४५ वाजलेले आहेत. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आता सचिवांनी प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात केलेली आहे. एखादया नगरसेवकांनी प्रश्न दिल्यानंतर त्याची काय पध्दत आहे. ती पध्दत मला सांगा. कारण मी मागच्या सभेला प्रश्न दिलेला होता. त्याचे उत्तर मला अजूनपर्यंत मिळालेले नाही किंवा तो प्रश्न विषयपत्रिकेच्या

पटलावर आलेला नाही. आजच्या महासभेला मी एक प्रश्न दिलेला होता. तो प्रश्न विषयपटलावर आलेला नाही. मला त्या प्रश्नाचे उत्तर अजूनपर्यंत दिलेले नाही. मी विषय दिलेले आहेत. ही सभा सकाळी चालू झाली पाहिजे, व्यवस्थित चालू झाली पाहिजे असे आपण आपल्या वक्तव्यामध्ये बोललात. आमचासुध्दा तसाच हेतू आहे. परंतु, बहुतेक पत्रांची उत्तरे महापालिकेकडून मिळत नाही. प्रश्नोतर हा महासभेचा अधिकार आहे. त्यालाही उत्तर मिळत नाही. म्हणजे ही किती दुर्दैवाची बाब आहे ते बघा. सभागृहाची वेळ फुकट जात आहे. आम्ही जे प्रश्न देतो ते प्रश्न शहराच्या विकासासाठी असतात. आता या प्रश्नोत्तराच्या तासामध्ये मी जे दोन विषय दिलेले आहेत. त्यासंबंधी सांगायचे झाले तर ती जी आरक्षित जागा आहे. त्या आरक्षित जागेवर अतिक्रमण झालेले आहे. हे प्रशासनाला माहिती आहे. परंतु, प्रशासन काहीही करित नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरसाहेबांच्या परवानगीने बोलतो. मा. महापौरसाहेबा, हया कामकाजाचे स्वरुप बरोबर आहे असे मला वाटते. माझा प्रश्न हयाच्यामध्ये इन्क्ल्युड केलेला नाही असे सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांचे म्हणणे आहे. परंतु, हा काही हयाच्यातील विषय नाही. आपण खरे म्हणजे हया पहिल्या प्रश्नातच आहोत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी सचिवांना विचारलेले आहे. आम्ही आजच्या सभेसाठी प्रश्न दिलेला होता. त्या प्रश्नाचा रितीरिवाज काय आहे? सभागृहनेते, प्रशासनाने त्याला कशापध्दतीने उत्तर दयायला पाहिजे हे आम्हाला माहिती नाही म्हणून आम्ही विचारतो. आम्हाला जर ज्ञान असेल तर ज्ञानाचा सदुपयोग झाला पाहिजे. म्हणजे वेळ जाणार नाही. सभागृहाची वेळ वाया जायला नको अशी आमचीसुध्दा इच्छा आहे. सभागृहनेते, तुम्ही उत्तर देण्यापेक्षा सचिवांनी उत्तर दिले तर फार उत्तम होईल. सचिवसाहेब, मी तुम्हाला मागच्या सभेचा प्रश्न दिलेला आहे आणि आजच्या सभेचा प्रश्नसुध्दा दिलेला आहे. त्याची नेमकी काय पध्दत आहे ती पध्दत सचिवांनी आम्हाला सांगावी अशी आमची अपेक्षा आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल, पुढिल सभेच्या अगोदर आपल्या प्रश्नाचे उत्तर प्रशासन देईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, मागच्या महासभेतसुध्दा असेच सांगितले होते. परंतु, अजूनपर्यंत मला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल, आपल्याला आपल्या प्रश्नाचे उत्तर जरुर मिळेल. मला वाटते की आपली सुचना संपलेली आहे. त्यामुळे आपण कृपा करुन बसुन घ्यावे. सचिव, पुढिल कामकाजाला सुरुवात करावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, आपला जो अतिक्रमण विभाग आहे. त्या अतिक्रमण विभागाकडे नगररचनाने एक पत्र पाठविलेले आहे. आम्ही त्या पत्राचे उत्तर मागितले तर आम्हाला उत्तर मिळत नाही. तुम्ही त्या विभागाच्या लोकांना उभे करुन त्या पत्राचे उत्तर दयायला सांगा. आपला जो १९० फुटचा हायवे आहे. तो एक महत्वाचा रस्ता आहे. त्या ठिकाणी गटारावर बांधकाम सुरु झालेले आहे. म्हणजे गटाराची हद्द सोडत नाही. आपण शेवटी या शहराला काही देणार आहोत की नाही. हा आमचा खाजगी प्रश्न नाही. अतिक्रमण विभाग काहीच लक्ष देत नाही.म्हणून आम्हाला हा प्रश्न विचारावा लागला.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल, आपला प्रश्न समजलेला आहे. आपण बसून घ्यावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, अतिक्रमण विभागाकडून कधी आणि कसे उत्तर मिळेल ते तुम्ही प्रथम मला सांगा. पुढची महासभा एक महिन्यानंतर येणार आहे. त्याच्या आधी म्हणजे पाच-सहा दिवसात कधी उत्तर मिळेल ते सांगा. विकासकर्त्यांनी स्वतः पत्र दिलेले आहे. माझ्या जागेवरील आरक्षणावर अतिक्रमण चालू आहे. तरी अतिक्रमण विभाग लक्ष देत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल, आपल्याला आपल्या प्रश्नाचे उत्तर लवकरात लवकर त्या संबंधित विभागाचे अधिकारी देतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या प्रश्नाचे उत्तर मला किती दिवसात मिळेल?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल, तुम्हाला तुमच्या प्रश्नाचे उत्तर दहा दिवसाच्या आतमध्ये मिळेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठिक आहे.

**प्र. सचिव :-**

प्रश्न क्र. २६ हा सन्मा. सदस्य केशव रामभाउ घरत यांचा प्रश्न आहे. आता ठिक ११.५० वाजलेले आहेत.

**केशव घरत :-**

मा. महापौर महोदया, माझा या ठिकाणी प्रश्न आहे. आपलासुध्दा या ठिकाणी प्रश्न आहे. आपण ज्यावेळेला प्रश्न दिलेला होता त्यावेळेला आपण एक नगरसेविका होत्या. आपण आपल्या सुदैवाने आता महापौर झालात. तेव्हा आपला जो प्रश्न होता तो प्रश्न मी विचारला तर चालेल का? कारण तो प्रश्न आपल्या प्रभागाशी संबंधित आहे. दलित वस्तीचा प्रश्न आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य केशव घरत, तुमचा जो प्रश्न आहे. तो प्रश्न तुम्ही सुरुवातीला विचारा.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, मी दोन्ही प्रश्न एकत्र घेणार आहे. म्हणून मी विचारले.

**मा. महापौर :-**

प्रथम प्रश्न क्र. २६ ने सुरुवात करा.

**केशव घरत :-**

मा. महापौर महोदया, दुर्बल घटक व दलित वस्ती मागासवर्गीय फन्ड याच्यामध्ये काय फरक आहे. याचे उत्तर मला प्रशासनाने दयावे.

**शरदचंद्र वैरागडे :-**

दुर्बल घटक विकास योजने अंर्तगत सन २००३-०४ साली रु. ७३ लाख ७० हजार एवढा खर्च झालेला आहे.

**केशव घरत :-**

दुर्बल घटक आणि दलित वस्ती मागासवर्गीय फन्ड यात काय फरक आहे असा प्रश्न मी विचारलेला आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सन्मा. सदस्य केशव घरतसाहेब, आपण या ठिकाणी जो प्रश्न विचारलेला आहे. तो प्रश्न आमच्याकडे लिहिलेला आहे. तो प्रश्न असा आहे की दुर्बल घटक योजने अंर्तगत महापालिकेच्या सन २००३-०४ च्या अर्थसंकल्पात एकूण किती रक्कमेची तरतुद करण्यात आलेली आहे. कृपया रक्कम स्पष्ट करावी. सन २००३-०४ या आर्थिक वर्षामध्ये रु. ४३ लाख ७२ हजार एवढी तरतुद करण्यात आलेली आहे. सन २००४-०५ मध्ये रु. ७६ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे. सन २००५-०६ मध्ये रु. ५५ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.

**केशव घरत :-**

मी त्या प्रश्नाला उपप्रश्न विचारतो की सदरचा फन्ड म्हणजे मागासवर्गीय फन्ड आणि दुर्बल घटक फन्ड याच्यामध्ये काय फरक आहे?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.)) :-**

दुर्बल घटकांवरचा जो खर्च आहे. तो महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामधील बांधील खर्चावरुन आपण त्याचे दोन टक्के काढतो. तो दुर्बल घटकाचा खर्च होतो. दलित वस्ती ही योजना महाराष्ट्र शासनाची असून शासनाच्यामार्फत आपण ज्या ठिकाणी काम करतो. आपण त्याचे प्रस्ताव त्या ठिकाणी पाठविल्यानंतर त्याला मंजुरी मिळाल्यानंतर त्या मंजुरीच्या अंर्तगत आपल्याला त्यांच्याकडून अनुदान मिळते आणि त्या अनुदानामधून आपण हा खर्च करतो.

**केशव घरत :-**

साहेब, माझे असे म्हणणे आहे की आपण आता जो मागासवर्गीय फन्ड सांगितला त्याबाबत आपण इथे उत्तर दिलेले आहे की सन २००३-०४ या आर्थिक वर्ष अर्थसंकल्पामध्ये दुर्बल घटक विकास

योजने अंर्तगत रु. ४३ लाख ७२ हजाराची तरतुद करण्यात आलेली होती. कारण माझा हा प्रश्न येता-येता दोन वर्षे गेलेली आहेत. माझे असे म्हणणे आहे की हा जो सन २००३-०४ चा फन्ड आहे. हा फन्ड कुठे वापरला.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सन २००३-०४ च्या आर्थिक वर्षामध्ये हा फन्ड कुठे-कुठे वापरला. याचे वर्गीकरण मी आपल्याला सांगतो. सन २००३-०४ या आर्थिक वर्षातील दुर्बल घटक खर्चाचे विवरण पत्र :- जनता नगर येथे नीलकमल हॉटेल ते लिबर्टी डेरी कंपाउन्डपर्यंत गटार बांधून स्लॅब टाकणे रक्कम रु. ३ लाख ४८ हजार ७८०, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८ वरील जनता नगर येथे येसु बाई वैजलॅन्डच्या घराजवळ संरक्षण भिंत बांधणे रक्कम रु. २ लाख ७४ हजार ९७१, राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील चेणा गाव येथील प्राथमिक शाळेसमोर पाईप क्रॉस ड्रेन बनविणे रक्कम रु. ३० हजार १४५, भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १९ मधील गटार स्लॅब यांचे दुरुस्तीसह नुतनीकरण करणे रक्कम रु. २ लाख ९८ हजार ५४४, काम घोडबंदर कापडिया कंपाउन्ड येथे संरक्षण भिंत बांधणे रक्कम रु. १२ लाख ५४ हजार ११५, पेणकरपाडा चिमाजी शिवशक्ती नगर सी.सी. रस्ते दुरुस्त करणे रक्कम रु. १० लाख ७८ हजार ५२१, राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील माशाचा पाडा रोडवर मीनाक्षी नगरजवळ क्रॉस ड्रेन बांधणे रक्कम रु. ३ लाख ९६ हजार ९२४, मिरा भाईंदर क्षेत्रात बारा फायर मुता-या करुन बसविणे रक्कम रु. ६ लाख ९० हजार एकूण टोटल रु. ४३ लाख ७२ हजार.

**केशव घरत :-**

साहेब, सदरचा फन्ड जिथे आदिवासी वस्त्या जास्त असतील त्या विभागात वापरला जाईल असे उत्तर या ठिकाणी दिलेले आहे. मग मिरा भाईंदरला आदिवासी वस्त्या कुठे आहेत? घोडबंदर किंवा कुठेही जी काही कामे दुर्बल घटकातून केलेली आहेत. त्या नगरसेवकाला तशी सुचनासुध्दा दिलेली आहे का? सदरचे काम दुर्बल घटकातून केले जात आहे. ज्या प्रभागात आदिवासी वस्त्या ५० टक्केपेक्षा जास्त असतील अशा ठिकाणीच हा फन्ड वापरला जाईल असे आपण या ठिकाणी उत्तर दिलेले आहे.

**शरदचंद्र वैरागडे :-**

हयाच्यामध्ये जनता वॉर्ड आणि नीलकमल हॉटेलला............

**केशव घरत :-**

साहेब, प्रभाग क्र. १० आणि प्रभाग क्र. ११ हे वॉर्ड राखीव आहेत. हे बरोबर आहे. हे मला मान्य आहे. परंतु, भाईंदरला जो दुर्बल घटकातून फन्ड वापरला. तो फन्ड कसा वापरला. जिथे ५० टक्केपेक्षा आदिवासी वस्त्या जास्त असतील अशा ठिकाणी हा फन्ड वापरला जाईल असे तुम्ही उत्तरामध्ये दिलेले आहे. मग भाईंदरला आदीवासी वस्त्या कुठे आहेत. या ठिकाणी जे उत्तर दिलेले आहे. ते उत्तर तुम्ही बघा.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते की भाईंदर पूर्व प्रभाग क्र. १९ कुठे आला? आता मा. उपायुक्त रणखांबसाहेबांनी प्रभाग क्र. १९ बद्दल सांगितले. हा प्रभाग क्र. १९ भाईंदर पश्चिमला येतो.

**दिपक खांबित :-**

सन्मा. सदस्य केशव घरत, या ठिकाणी आदिवासी वस्त्या हा शब्द चुकुन पडलेला आहे.

**केशव घरत :-**

खांबितसाहेब, त्या भागातच आदीवासी आणि दुर्बल घटक हा फन्ड वापरला जाणार आहे असे उत्तर मला उत्तर दिलेले आहे.

**दिपक खांबित :-**

होय.

**केशव घरत :-**

मग आम्ही तुम्हाला असा प्रश्न विचारतो की भाईंदरला आदिवासी वस्त्या कुठे आहेत?

**दिपक खांबित :-**

तो फन्ड भाईंदरला कुठे वापरला आहे. उत्तनला वापरलेला आहे. आदिवासी वस्त्या हे चुकीचे आहे.

**केशव घरत :-**

तुम्ही दिलेले उत्तर चुकीचे आहे असे तुमचे म्हणणे आहे. मग तुम्ही चुकीची उत्तर देता का? आता दोन वर्षानंतर तेच उत्तर येत आहे.

**दिपक खांबित :-**

मागासवर्गीय लोक ५० टक्के आहेत.

**केशव घरत :-**

मागासवर्गीय लोक आहेत! तुम्ही मला दुर्बल घटकाचे सांगा. दलित वस्ती मागासवर्गीय फन्ड आला का? तो महाराष्ट्र शासनाकडून येत आहे. दुर्बल घटक हा फन्ड आपल्या महापालिकेमार्फत वापरला जातो.

**दिपक खांबित :-**

दुर्बल घटकाचा फन्ड मागासवर्गीय प्रभागामध्ये वापरायचा असतो.

**केशव घरत :-**

कसा काय? या ठिकाणी तुम्ही काय उत्तर दिलेले आहे?

**दिपक खांबित :-**

त्या ठिकाणी आदिवासींच्याऐवजी मागासवर्गीयांच्या वस्त्या असे आहे.

**केशव घरत :-**

तसे पाहिले तर प्रभाग क्र. १० आणि प्रभाग क्र. ११ हे दोन प्रभाग असे आहेत की जे राखीव आहेत. त्या दोन्ही प्रभागात आदिवासी वस्त्या असल्या कारणाने त्या ठिकाणी एस.टी.चे दोन नगरसेवक आहेत.

**दिपक खांबित :-**

आदिवासींचे असे जे उत्तर दिलेले आहे. ते आदिवासी नसुन मागासवर्गीय वस्त्या असे करेक्शन करुन घ्या.

**केशव घरत :-**

तुम्ही असे कसे म्हणता? तुम्ही हा दलित वस्ती फन्ड कुठे वापरता? तुम्ही तसे म्हणाल तर तुम्ही आदिवासी पाडयांना सुविधा कशी देणार?

**दिपक खांबित :-**

आदिवासी वस्त्यांकरिता वेगळा असा फन्ड नसतो.

**केशव घरत :-**

तुम्ही उत्तर देताना त्याच्यामध्ये तसा फन्ड नमुद केलेला आहे.

**शरदचंद्र वैरागडे :-**

सन्मा. सदस्य केशव घरतसाहेब, हयाच्यामध्ये जे उत्तर दिलेले आहे ते चुकून आदिवासी छापण्यात आलेले आहे.

**केशव घरत :-**

साहेब, दोन वर्षे झाली. हे उत्तर येत आहे. बरोबर २४ महिने झाले.

**दिपक खांबीत :-**

आदिवासी वस्त्या नसुन मागासवर्गीय वस्त्या आहेत.

**केशव घरत :-**

साहेब, दोन वर्षे झाली. परंतु, सारखे तेच-तेच उत्तर येत आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, खांबितसाहेबांनी उत्तर दयावे की सिटी इंजिनियरसाहेबांनी उत्तर दयावे हे प्रथम निश्चित करुन घ्या. दोघे-दोघे कसे उत्तर देतात. काय समजायचे हा गोंधळ आहे. कोणी एकाने उत्तर दयावे,काय उत्तर दयावे ते निश्चित करुन घ्या. कायदयामध्ये सिटी इंजिनियरने उत्तर दयायचे असते.

**शरदचंद्र वैरागडे :-**

मी उत्तर देतो. हा पत्रव्यवहार पूर्वीच झालेला आहे. त्याच्यामध्ये मी, खांबित जेव्हा होतो तेव्हा त्यांची मदत घेतलेली आहे. हया पत्रामध्ये अनुसुचित जमातीचा उल्लेख आहे. मी या ठिकाणी पत्राचे वाचन करतो :- समाजातील दुर्बल घटक, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती हयांच्या कल्याणकारी योजनेसाठी नगरपालिकेने राखून ठेवण्याचा पाच टक्के महसुल वापरायचा आहे. हे महाराष्ट्र शासन नगरविकास यांचे शासन परिपत्रक क्र. बी.बी.सी., बी.सी.सी. १०८१/६०५६ यु.डी.-१० हे पत्र तुम्हाला वाचून दाखविलेले आहे.

**केशव घरत :-**

साहेब, तुम्ही हे जे पत्र  वाचून दाखविले त्याच्यामध्ये आदिवासींचा कुठेही उल्लेख नाही.

**दिपक खांबित :-**

हया पत्रामध्ये अनुसुचित जमाती असा उल्लेख आहे.

**केशव घरत :-**

भटक्या जमाती वेगळया वर्गामध्ये येतात.

**शरदचंद्र वैरागडे :-**

मी पुन्हा एकदा पत्राचे वाचन करतो.(पत्राचे वाचन केले.)

**केशव घरत :-**

आपण वाचलेले पत्र बरोबर आहे.परंतु, माझे असे म्हणणे आहे की समजा दोन्ही फन्ड म्हणजेच दलित वस्ती मागासवर्गीय फन्डसुध्दा दलित वस्तीमध्ये वापरला जाणार आहे. मग तुम्ही आदिवासी पाडयांसाठी कुठला फन्ड वापरणार आहात ते मला सांगा. तुम्ही उत्तर देताना सांगता की ५० टक्के आदिवासी वस्त्या असतील अशा ठिकाणी सदरचा फन्ड वापरला जाईल आणि तुम्ही आता सांगता की तो फन्ड संपूर्ण हयाच्यासाठी आहे.

**शरदचंद्र वैरागडे :-**

दुर्बल घटकांसाठी जसा फन्ड आहे. तसा आदिवासी वस्त्यांसाठी वेगळा असा फन्ड नाही.

**केशव घरत :-**

साहेब, सन्मा. सदस्य रविंद्र माळी यांच्या प्रश्नाला तुम्ही खाली उत्तर दिलेले आहे की आदिवासी वस्त्यांसाठी फन्ड नाही. मग आता जास्तीत जास्त खर्च म्हणजे जिथे दलित वस्त्या असतील तिथे तो फन्ड वापरायचा किंवा आदीवासी वस्त्या किंवा असे जे पाडे आहेत तिथे तो फन्ड वापरायचा आहे हे तुमचे उत्तर बरोबर आहे. आता आमच्या प्रभागात किंवा प्रभाग क्र. १० आणि प्रभाग क्र. ११ मध्ये जे आदीवासी पाडे आहेत अशा पाडयांसाठी असा जो फन्ड आहे. तो त्याच्यासाठी वापरा असे माझे या ठिकाणी म्हणणे आहे.

**दिपक खांबीत :-**

ठिक आहे. पुढे वापरु. हयावर्षी प्रस्तावित करु.

**केशव घरत :-**

कारण तेथील नागरिकांची पाण्याची समस्या आहे. तेवढया लांब पाईपलाईन नेण्यासाठी आपल्याकडे फन्ड नाही असे प्रत्येकवेळेला सांगितले जाते.

**दिपक खांबीत :-**

आपण जनरल फन्डामधून ती सगळी कामे घेतोच. म्हणजे आपण जनरल फन्डामधून ती कामे प्रपोज करतो.

**केशव घरत :-**

तुमचे म्हणणे बरोबर आहे. परंतु, सदरचा फन्ड हा दुर्बल घटकातील फन्ड आहे. हा फन्ड आदिवासी पाडयांसाठी वापरा असे माझे म्हणणे आहे. सन २००४-०५ हा दुर्बल घटक फन्ड कुठे वापरला.

**दिपक खांबित :-**

आपल्याला माहिती सांगितलेली आहे.

**केशव घरत :-**

ती माहिती सन २००३-०४ ची सांगितलेली आहे. सन २००४-०५ ची माहिती सांगा.

**दिपक खांबित :-**

तुमचा प्रश्न तेवढयाच माहितीचा आहे.

**शरदचंद्र वैरागडे :-**

सन्मा. सदस्य केशव घरत, तुम्ही सन २००३-०४ चाच फक्त प्रश्न विचारलेला होता.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर, मला वाटते की तुम्ही हया प्रकरणामध्ये हस्तक्षेप करावा. आपल्या अधिका-यांकडून कशी उत्तरे मिळतात ती जरा बघा. एखादा सन्मा. सदस्य काय प्रश्न विचारतो. रुलिंगवाला सदस्य आहे. रुलिंगवाला सदस्य काय प्रश्न विचारतो आणि प्रशासन काय उत्तर देते. मग हया लोकांनी अभ्यास केलेला आहे की नाही. हे अधिकारी अशी उत्तरे का देतात. आपला प्रश्न आहे तर हया अधिका-यांनी अभ्यास करायला नको का? रुलिंगवाल्या पार्टीला ही लोक अशी उत्तरे देतात म्हणजे काय? प्रश्न काय विचारला तो समजून नंतर काय उत्तर दयायचे ते ठरवा.

**शरदचंद्र वैरागडे :-**

सन्मा. सदस्य केशव घरत यांनी जो ओरिजनल प्रश्न विचारलेला होता. त्याच प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे.

**मिलन पाटील :-**

ओरिजनल प्रश्न काय विचारला होता ते बघा. त्यांचा मुळ प्रश्न काय आहे तो तुम्हाला समजत नाही. केवढा खर्च करावा? कुठे खर्च करावा? त्याच्यामध्ये काय तफावत आहे. ते सन्मा. सदस्य केशव घरत विचारत आहेत. तुम्ही प्रश्नाचे उत्तर नीट समजून दया. तुम्ही त्याचा आदल्या दिवशी स्टडी करुन यायला पाहिजे.

**केशव घरत :-**

साहेब, माझा प्रश्न असा आहे की तुम्ही आम्हाला सन २००३-०४ चे सांगता. परंतु, सन २००३-०४ पर्यंतचा माझा प्रश्न येता-येता दोन वर्षे गेली. त्याचे काय करायचे. मला उत्तर मिळण्यासाठी जर माझा प्रश्न दोन वर्षापूर्वी आला असता आणि मला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले असते तर तुम्ही फन्ड कुठे वापरला, त्या फन्डाचे काय केले असा प्रश्न मी पुढच्या वर्षी रिपीट केला असता का?

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की ही जी व्याख्या चाललेली आहे. त्याच्यामुळे कुठेतरी थोडीशी दिशाभुल होत आहे. हा जो निधी आहे. हा निधी जो वापरायचा आहे. तो प्रभागासाठी वापरण्याची कोणतीही तरतुद नाही. ज्या ठिकाणी वस्ती आहे. त्या वस्तीचे सर्वेक्षण केले जाते. प्रभागीय आरक्षणाच्या दृष्टिने सिलेक्ट केले जाते. ज्या प्रभागामध्ये तशी वस्ती जास्त आहे. त्या दृष्टिने ते प्रभाग आरक्षित केले जातात. परंतु, अन्य प्रभागामध्ये जर दलित वस्ती असेल तर त्या दलित वस्तीसाठी तो खर्च केला पाहिजे अशी तरतुद आहे अशी मी सभागृहाला माहिती देतो.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, या ठिकाणी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आणि सन्मा. सदस्य केशव घरत यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्या अनुषंगाने तुम्ही जो दुर्बल घटकातील फन्ड इतर प्रभागामध्ये वापरला. तर त्या ठिकाणचा सर्व्हे झालेला आहे का? इतर एस.टी., एन.टी., एस.सी. त्या विभागात त्या प्रमाणात आहेत का? तुम्ही जर तो फन्ड वापरलेला आहे तर त्याचा सर्व्हे कोणी केला?

**दिपक खांबित :-**

आपण तो फन्ड त्या वस्तीमध्येच वापरलेला आहे. जिकडे एस.सी., एस.टी.ची लोक आहेत. तिकडेच तो फन्ड वापरलेला आहे.

**शरदचंद्र वैरागडे :-**

वॉर्ड क्र. १० आणि वॉर्ड क्र. ११ हे रिझर्व्ह वॉर्ड आहेत. आपण त्याच्यामध्ये हा फन्ड प्रामुख्याने वापरलेला आहे.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, हे दोन रिझर्व्ह वॉर्ड आहेत. त्याच्याबद्दल वाद नाही. तो फन्ड दुस-या प्रभागात वापरला असा मुद्दा सन्मा. सदस्य केशव घरत यांनी उपस्थित केलेला आहे आणि समजा ज्या विभागामध्ये तो समाज जास्त आहे. तो घटक जास्त प्रमाणात आहे. त्या ठिकाणी हा फन्ड वापरता येतो असा नियम आहे असे सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी सांगितलेले आहे. ज्या प्रभागात हा फन्ड वापरला त्या प्रभागात तो घटक आहे का? त्याचे सर्वेक्षण कोणी केले? परस्पर एखादया नगरसेवकाने सांगितले इथे तो दुर्बल घटकातील फन्ड वापरा आणि तुम्ही वापरलेला आहे असा काही प्रकार आहे का? आपल्याकडे अशाप्रकारे नोंद आहे का?

**दिपक खांबित :-**

त्याप्रमाणेच तो फन्ड वापरलेला आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मग त्याचा त्या प्रभागात सर्व्हे झालेला होता का?

**दिपक खांबित :-**

होय.

**प्रकाश दुबोले :-**

तो सर्व्हे कोणी केला? आपल्याकडे त्याची नोंद आहे का? तशाप्रकारे कुठे रेकॉर्डवर आलेले आहे का? त्या प्रभागामध्ये एवढया प्रमाणामध्ये भटक्या जाती, विमुक्त जातीचे लोक राहतात असे महापालिकेच्या कोणत्या रेकॉर्डवर आहे?

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे त्याची सगळी माहिती उपलब्ध आहे.

**प्रकाश दुबोले :-**

तो सर्व्हे कोणी केलेला आहे. ती माहिती आपल्याकडे कोणत्या सर्व्हेमध्ये आलेली आहे.

**दिपक खांबीत :-**

आपल्याकडे प्रभागवाईज माहिती उपलब्ध आहे. म्हणजे आपली जी सन २००१ ची जनगणना झाली. त्यानुसार ती माहिती उपलब्ध आहे. कुठल्या प्रभागात किती लोक आहेत आणि त्याच्यामध्ये दलित, मागासवर्गीय किती लोक आहेत. ती सगळी माहिती आपल्याकडे उपलब्ध आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मग मघापासून सन्मा. सदस्य केशव घरतसाहेब तोच मुद्दा उपस्थित करित आहेत. या प्रभागामध्ये एवढया परसेन्टेजमध्ये भटक्या जातीचे एवढे लोक राहतात, विमुक्त जातीचे एवढे लोक राहतात. त्यामुळे आम्ही तो फन्ड त्या ठिकाणी वापरलेला आहे असे तुम्ही त्यांना सांगा. तुमचा वॉर्ड रिझर्व्ह असेल तर आम्ही तिथे वापरतो असे सांगा. प्रशासन काही काम करित नाही असे तुम्ही उगीचच सभागृहासमोर कशाला आणता? तुमच्याकडे जी माहिती आहे. ती लपवु नका. तुम्ही ती माहिती सभागृहाला स्पष्ट सांगा.

**दिपक खांबित :-**

सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले हा प्रश्न तुम्ही विचारलेला आहे. हा प्रश्न सन्मा. सदस्य केशव घरत यांनी विचारलेला नाही.

**प्रकाश दुबोले :-**

परंतु, त्यांचे म्हणणे तेच आहे.

**केशव घरत :-**

माझे म्हणणे तेच आहे की तुम्ही हा फन्ड रिझर्व्ह वॉर्डसाठी वापरणार आहात. मग दोनच रिझर्व्ह वॉर्ड आहेत.

**दिपक खांबित :-**

आम्ही हा फन्ड रिझर्व्ह वॉर्डसाठी वापरतच नाही. हा फन्ड सगळया प्रभागाकरिता आहे. ज्या प्रभागामध्ये अनुसुचित जाती-जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती जास्त आहेत. त्या वॉर्डमध्ये हा फन्ड वापरायचा आहे.

**केशव घरत :-**

आता तुम्ही सांगतात की तो फन्ड दुस-या प्रभागामध्ये वापरला गेलेला आहे. त्या प्रभागात इतके लोक राहतात त्याचे सर्वेक्षण कोणी केले.

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे जनगणना सन २००१ ची माहिती उपलब्ध आहे.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य केशव घरत तेच विचारत आहेत. तुमच्याकडे माहिती उपलब्ध असेल तर तुम्ही ती माहिती त्यांना दया.

**रतन पाटील :-**

तुमच्या आजूबाजूला किती लोक राहतात. ही माहिती त्यांना दयायला पाहिजे होती.

**केशव घरत :-**

मी मा. महापौर मॅडमचा प्रश्न विचारतो. सन २००३-०४ चा जो दलित वस्ती मागासवर्गीय फन्ड आहे तो कुठल्या प्रभागात वापरला.

**दिपक खांबित :-**

तुम्हाला कुठल्या सालची दलित वस्ती पाहिजे.

**केशव घरत :-**

मागासवर्गीय दलित वस्ती सन २००३-०४ चा जो महाराष्ट्र शासनाचा फन्ड आहे. त्याबद्दल मी बोलतो.

**शरदचंद्र वैरागडे :-**

सन २००३-०४ चा दलित वस्ती मागासवर्गीय फन्ड आहे. तो घोडबंदर येथे शंकर मंदिर ते कापडिया कंपाउन्ड रेशनिंग दुकानापर्यंत रस्ते.

**केशव घरत :-**

साहेब, माझे असे म्हणणे आहे की हा जो फन्ड तुम्ही वापरला तेव्हा हा फन्ड दलित वस्तीमधील फन्ड वापरतो अशी तुम्ही आम्हाला कल्पना का दिली नाही.

**दिपक खांबित :-**

महासभेची मंजुरी घेउनच हे काम केलेले आहे.

**केशव घरत :-**

दुर्बल घटकातील फन्ड कुठे वापरला आणि दलित वस्तीचा फन्ड कुठे वापरला याची आम्हाला कल्पनाच नाही.

**दिपक खांबीत :-**

तुमची मंजुरी घेउनच दलित वस्तीचा फन्ड केलेला आहे. आपण दलित वस्तीचा फन्ड वापरतो. तेव्हा त्याच्यामध्ये दलित वस्तीचा फन्ड असे क्लिअर-कट म्हटलेले असते.

**केशव घरत :-**

कुठे.

**दिपक खांबित :-**

हा जो फन्ड आहे. सन २००३-०४ ची मंजुरी तत्कालीन नगरपालिका असताना त्यांनी दिलेली होती. परंतु, तो खर्च महानगरपालिका सन २००३-०४ हया वर्षी पडलेला आहे.

**केशव घरत :-**

साहेब, तुमचे म्हणणे बरोबर आहे. परंतु, तुमच्याकडे सदरचा फन्ड हा रस्त्यासाठी दलित वस्तीमधून वापरलेला आहे याची आम्हाला कल्पना दया. सन २००३-०४ साली आम्ही नगरसेवक होतो. मग तुम्ही आम्हाला त्याची कल्पना दयायला पाहिजे होती.

**दिपक खांबीत :-**

हे मंजुरी घेउनच केलेले आहे. तेव्हा क्लिअर-कट लिहिलेले होते.

**केशव घरत :-**

मी असे म्हणत नाही की मंजुरी न घेता केलेले आहे. मंजुरी घेउनच केलेले आहे.

**दिपक खांबीत :-**

त्या मंजुरीमध्ये दलित वस्ती असे लिहिले होते.

**केशव घरत :-**

ठिक आहे. पुढे वाचा.

**शरदचंद्र वैरागडे :-**

दुसरे काम म्हणजे माशाचा पाडा रोडवर डिसोझावाडी ते मीनाक्षी नगर रस्ता रुंदिकरण, खडीकरण, डांबरीकरण करणे हे रु. ४ लाख ९२ हजाराचे काम आहे.

**दिपक खांबित :-**

पुढचे काम कुठले पाहिजे.

**केशव घरत :-**

दलित वस्ती सन २००३-०४ चे पाहिजे.

**दिपक खांबित :-**

परंतु, आमच्याकडे ही दोनच कामे आहेत.

**केशव घरत :-**

तेवढी दोनच कामे आहेत. मग फन्ड किती होता.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सन्मा. सदस्य केशव घरतसाहेब, आपण जो मुळ प्रश्न विचारलेला आहे. त्या प्रश्नाची मी आपल्याला सविस्तर माहिती देतो. आपला पहिला बेसीकली प्रश्न दुर्बल घटकाबद्दलचा होता आणि दुसरा प्रश्न राखीव निधीबद्दल होता. पहिला प्रश्न असा होता की सन २००३-०४ मध्ये किती खर्च आला. याचे उत्तर आम्ही दिलेले आहे. त्यानंतर आपण दुर्बल घटक आणि दलित वस्ती योजना यांचा फरक विचारला तोदेखील सांगितलेला आहे. आता दुर्बल घटकाच्या योजनेबद्दल हे दोन-तीन उपप्रश्न विचारलेले आहेत. मी तुम्हाला त्याची सविस्तर माहिती देतो. पहिली गोष्ट अशी आहे की हा जो खर्च केला जातो हयाच्यामध्ये दुसरी एक संकल्पना सांगतो की आता आपले सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आणि सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनीसुध्दा विचारलेले आहे की एखादा वॉर्ड आरक्षित आहे आणि आपल्याला त्याच्यामध्ये हया योजने अंर्तगत खर्च करायचा आहे. परंतु, आम्ही या ठिकाणी ज्या-

ज्यावेळेस ही योजना तयार झाली त्या-त्यावेळेस या योजनेमधून काय अडचण येउ शकते हयाचा शासनाच्या स्तरावर विचार झालेला होता की एखादा वॉर्ड आहे. परंतु, तो आरक्षित नाही. त्या वॉर्डकडे जाणारा जो रस्ता आहे. तो त्या आरक्षित वॉर्डच्या बाहेर आहे. त्या ठिकाणीदेखील आपण खर्च करु शकतो. कारण त्या रस्त्याचा उपयोग त्या आरक्षित वॉर्डसाठी होणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात दिसताना हा खर्च त्या आरक्षित वॉर्डच्या बाहेर दिसला तरी प्रत्यक्ष त्या रस्त्याचा उपयोग त्या आरक्षित ठिकाणी केला जातो. त्यामुळे हा खर्च जरी बाहेर केला तरी त्या कारणासाठी म्हणजे त्याचे जे काही मुळ इन्टेन्शन आहे. त्याचा मुळ उद्देश काय आहे हा पाहिला जातो. खर्च जरी बाहेर केला तरी त्या वॉर्डकडे जो आरक्षित वॉर्ड आहे. आपल्याला ज्या ठिकाणी खर्च करायला तो पात्र आहे असा सन्मा. सदस्य मिलन पाटीलसाहेबांचा प्रश्न योग्य होता. आपण बाहेर रस्ता तयार केला परंतु, मेन स्ट्रिटपासून त्या वॉर्डपर्यंत जाण्यासाठी हा जो मधला रस्ता आहे. हा आरक्षित नसला तरी तो आपण करु शकतो. कारण त्याचा उद्देश, त्या रस्त्याचा उद्देश त्या वॉर्डला सुविधा देणे असा आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की सन २००३-०४ चा मी तुम्हाला रु. ४३ लाख ७२ हजार इतका खर्च सांगितला. त्यानंतर सन २००५-०६ चा खर्च सांगितला.

**केशव घरत :-**

मला मागासवर्गीयांच्या फंडाच्या प्रश्नासंदर्भात विचारायचे आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सन्मा. सदस्य केशव घरतसाहेब, तुम्ही दुर्बल घटकामध्ये दलित वस्ती अंर्तगत योजनांची गफलत त्याच्याशी करु नका. ती योजना पूर्णपणे महाराष्ट्र शासनाची स्वतंत्र योजना आहे. ही जी योजना आहे. ही महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये जी बजेटची रक्कम आहे. त्याच्या ॲप्लिकेबल खर्चाच्या दोन टक्के खर्च आपण दुर्बल घटकातून करतो आणि दुर्बल घटकातून खर्च करताना जो प्रभाग दुर्बल अंर्तगत येतो. तो आपल्या सेन्सेक्स गटाप्रमाणे जे प्रगणक गट आहेत. त्या गटाप्रमाणे तिथे कुठल्या प्रकारची लोकसंख्या आहे, कुठल्या जाती-जमातीचे लोक राहतात. हयाची माहिती उपलब्ध असते. या माहितीच्या अनुषंगाने बांधकाम खाते प्रस्ताव तयार करते आणि प्रस्ताव तयार केल्यानंतर तो प्रस्ताव आपल्यासमोर ठेवला जातो. प्रस्ताव आपल्यासमोर ठेवल्यानंतर आपल्यासमोर त्याची चर्चा होते आणि चर्चा होउन तो फायनल होतो. त्यानंतर आपण त्या कामाची सुरुवात करतो. त्यामुळे त्यावेळेस ती कामे कशी घेतली होती हा प्रश्न आपल्याला आता विचारणे योग्य होणार नाही. त्यावेळेस ती कामे कशी-कशी घेतली गेली. त्यावेळेस आपण हा मुद्दा उपस्थित केला असता तर कदाचित तुम्हाला त्याचे उत्तर मिळाले असते. हयावर्षी ज्यावेळेस आपण ती कामे घेउ त्यावेळेस ती कामे घेताना त्या दुर्बल घटका अंर्तगत खरोखर त्या-त्या वस्त्यांमध्ये ती योग्य आहेत किंवा नाही याची खातरजमा आपण करुन घ्या. जर नसेल तर त्याला मंजुरी देउ नका. त्यामुळे आता जी कामे आपण घेत आहोत. त्याचीसुध्दा खात्री केलेली आहे. या ठिकाणी दुर्बल गटा अंर्तगत अशा-अशा स्वरुपाची लोक राहतात आणि त्यांना सुविधा देणे अत्यंत गरजेचे आहे अशाप्रकारचे सर्टिफिकेशन त्याला प्रमाणित बांधकाम खाते करते. आपण त्याला मंजुरी देतो. महासभा, स्थायी समिती मंजुरी देते. त्यामुळे त्याच्या अंर्तगत झालेला खर्च आपण करतो. यानंतरच जी पुढची कामे येतील त्यावेळेस दुर्बल घटका अंर्तगत आम्ही जी कामे प्रस्तावित करु, बांधकाम खाते प्रस्तावित करेल. त्यावेळेस तुमचा त्याच्यामध्ये अंर्तभाव झाला नसेल तर तुम्ही हा प्रश्न निश्चितपणे उपस्थित करु शकता. परंतु, आता झालेल्या कामाबद्दल त्या ठिकाणी काय उपस्थित केलेले नाही हा प्रश्न आता या ठिकाणी कालानुरुप योग्य होणार नाही असे मला वाटते.

**मिलन पाटील :-**

साहेब, त्यांचा काय प्रश्न आहे. हा प्रश्न कशावरुन उपस्थित झाला. कापडीया कंपाउन्डमध्ये जी कंपाउन्ड वॉल बांधली ती दुर्बल घटक हयाच्यामधून बांधली. स्थानिक नगरसेवकांना जर हे माहिती नाही की हे काम दुर्बल घटकातून चालते. तर ते उदया लोकप्रतिनिधी आहेत. उदया दुर्बल घटकाचे काय काम चालते ते त्या लोकांना कळवायला पाहिजे. लोकप्रतिनिधी त्यांना सांगतील की हे काम आम्ही तुमच्यासाठी काढलेले आहे. हे तुमच्या हयाच्यासाठी काम आहे. अशी गोष्ट लोकप्रतिनिधींना माहिती नसेल तर ते काय सांगणार. तुम्ही तुमची कामे ठरवाल तेव्हा त्याला मान्यता दयाल आणि कराल. मॅडम, हयाच्यापुढे तुम्ही आदेश दया. जी दुर्बल घटकामध्ये कामे होतील त्याच्यामध्ये जे स्थानिक नगरसेवक असतील त्यांना तुम्ही पहिले लेटर दया की हे काम अमुकअमुक हयाच्यामधून चाललेले आहे आणि हे काम केले जाईल तुम्ही असे तुम्ही स्थानिक नगरसेवकांना लेटर दिल्यानंतर जे लोकप्रतिनिधी आहेत ते तेथील आदीवासी किंवा गरिब लोक असतील त्यांना सांगतील की हे काम आम्ही तुमच्यासाठी काढलेले आहे. पुन्हा त्यांना तिथे काम करायचे आहे. तुम्ही शासनाला ते डायरेक्ट कोणतेही काम हे

बांधकाम खाते काढतील, कशीही मान्यता घेतील आणि करतील. तसे चालणार नाही. तुम्ही त्यांना तसे आदेश दया की हयाच्यापुढे जी काही कामे करणार त्या कामाबद्दल तुम्ही नगरसेवकांना तशी कल्पना दिली पाहिजे.

**केशव घरत :-**

साहेब, माझा दुसरा प्रश्न दलित वस्ती मागासवर्गीय फन्ड संदर्भात विचारलेला होता. किती फन्ड आहे आणि त्याच्यामध्ये कुठली कामे केलेली आहेत.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.)) :-**

दलित वस्ती अंतर्गत सन २००२-०३, सन २००३-०४, सन २००४-०५ हया वर्षा अंतर्गत मी तुम्हाला माहिती देतो. आपल्याला सन २००२-०३ या वर्षासाठी रु. २० लाख दलित वस्तीचे अनुदान प्राप्त झालेले होते. त्याच्यामध्ये घोडबंदर येथे शंकर मंदिर ते कापडिया कंपाउन्ड रेशनिंग दुकानापर्यंत रस्ते खडीकरण, डांबरीकरण करणे रक्कम रु. ८ लाख १३ हजार १६६, त्यानंतर त्याच कामाच्या पुढच्या पार्टला रु. ७ लाख ६५ हजार ५७३ त्यानंतर तिसरे काम जरीमरी मंदिर रस्ता ब्रीजपर्यंत खडीकरण करणे याला रु. १२ लाख ९१ हजार २७३ असे मिळून रु. २८ लाख ७० हजार ०१२ चे काम सन २००२-०३ हया वर्षामध्ये पूर्ण केलेले आहे. त्या भागात कुठल्या योजने अंर्तगत काम होते. ते काम त्या संबंधित प्रभागाला समजायला पाहिजे, संबंधित नगरसेवकाला समजायला पाहिजे असा मुद्दा सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी उपस्थित केलेला आहे. हयाच्याबद्दलच्या आपल्या विनंतीप्रमाणे सुचना दिल्या जातील. हा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. त्याच्यानंतर सन २००४-०५ मध्ये रु. ५० लाखाचे अनुदान दलित वस्ती अंर्तगत आपल्याला मिळालेले होते. आपण त्याच्यामध्ये श्रीजी कन्स्ट्रक्शनला माशाचा पाडा रोडवर डिसोझावाडी ते मीनाक्षी नगर रस्ता रुंदीकरण, खडीकरण, डांबरीकरण रक्कम रु. ५ लाख २९ हजार ३७८. दुसरे काम भटाचा पाडा ते मीनाक्षी नगर अंर्तगत रस्ते सी.सी. करणे रु. १२ लाख ४६ हजार ०६५. तिसरे काम मांडवीपाडा, सेंट झेवियर्स हायस्कूल ते शनिवार हिंगे यांच्या घरापर्यंत रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे रक्कम रु. १५ लाख ५४ हजार ०५८ आणि चौथे काम राष्ट्रिय महामार्ग क्र. ८ वर गावठण येथे श्री. महाविष्णु मंदिरपासून नवीन गावठण रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे रक्कम रु. २२ लाख ९१ हजार २९५ असे रु. ५६ लाख २० हजार ७९६ चे काम सन २००४-०५ या वर्षामध्ये महापालिकेने पूर्ण केलेले आहे.

**केशव घरत :-**

सन २००५-०६ या आर्थिक वर्षामध्ये दुर्बल घटक निधी किती आहे?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.)) :-**

आपण अंदाजपत्रकाला मान्यता दिलेली आहे. तेव्हा आपण तो निधी हयाच्यामध्ये धरलेला आहे. हे आपल्याला माहिती पाहिजे.

**केशव घरत :-**

सन २००५-०६ चा जो दुर्बल घटक रु. ४५ लाख आहे. सदरचा निधी प्रभाग क्र. १० येथे नवीन स्मशानभूमी आणि दफनभूमी विकसित करण्यासाठी वापरण्यात यावा अशी मी सभागृहाला विनंती करतो. मॅडम, एक प्रश्न बाकी आहे. तो प्रश्न घेतला. म्हणजे हे तिन्ही प्रश्न संपतील. हया प्रश्नाला दोन मिनिटसुध्दा लागणार नाहीत. सन्मा. सदस्य रविंद्र माळी यांचा प्रश्न आहे. तो जर घेतला तर तिघांचे प्रश्न संपतील.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य केशव घरत, आपण हा प्रश्न पुढच्या वेळेस घेउया. सन्मा. सदस्य केशव घरत यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. हया चर्चेतून असे निदर्शनास आलेले आहे की दुर्बल घटक फन्ड आणि मागासवर्गीय दलित वस्तीचा जो फन्ड आहे. हा फन्ड आपण जेव्हा प्रभागामध्ये वापरत असतो तेव्हा हा फन्ड संबंधित विकास कामांसाठी वापरला जातो. तेव्हा त्या संबंधित अधिका-यांनी त्या नगरसेवकांना विश्वासात घेउन त्यांच्याकडून माहिती काढून पूर्णपणे सविस्तर चर्चा करुन त्यांना निदर्शनास आणून दया की अमुक कामासाठी आम्ही हा फन्ड वापरलेला आहे. यासाठी संबंधित अधिका-यांनी नगरसेवकांना विश्वासात घेणे गरजेचे आहे.

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांचे लक्षवेधीबाबत निवेदन आहे. जकात विभाग मा. उच्च न्यायालयात रिटपिटिशन ३७ (५८), ३८ (२३), १३ (१४१) दाखल असून त्याच्यावर अंतिम निर्णय झालेला नाही. म्हणून सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांच्या लक्षवेधीवर चर्चा करता येणार नाही असे मा. महापौरांनी रुलिंग दिलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आज हा विषय कोर्टात गेला असे आपण बोलता. परंतु, हा विषय कोर्टात का गेला? याची माहितीसुध्दा सभागृहाने घेतली पाहिजे. आपण जेव्हा कुठलेही काम बेकायदेशीर करतो.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम आणि सचिवसाहेब, मा. महापौरांनी लक्षवेधीवर निर्णय दिलेला आहे. त्याच्यामुळे आपण रुलिंग दिल्यानंतर त्या विषयावर चर्चा करु शकतो का?

**प्र. सचिव :-**

रुलिंग दिल्यानंतर काहीही करु शकत नाही.

**मा. महापौर :-**

निर्णय कोर्टात पेन्डिंग असल्यामुळे आपण हया विषयावर चर्चा करणे योग्य ठरणार नाही.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४ चे वाचन केले.)

**लिओ कोलासो :-**

आदरणीय महापौरसाहेबा, आपल्या अजेन्डयावरील विषय क्र. १४ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण क्र. २ नियम ३० अन्वये महिला व बालकल्याण समितीवर नउ महिला सदस्यांची ठरावाद्वारे निवड करणे हा विषय आहे. या कामी सत्तारुढ पक्षाची भुमिका विषद करण्यासाठी मी उभा आहे. गेल्या वर्षी ही समिती स्थापन होण्यासाठी आपण सांगोपांग विचार केलेला होता आणि संख्याबळाप्रमाणे आपण त्या समितीवर राष्ट्रवादी पक्षाच्या चार सन्मा. सदस्या, काँग्रेस पक्षाच्या तीन सन्मा. सदस्या, त्याचप्रमाणे जनता दलाचा एक प्रतिनिधी, शिवसेनेचा एक प्रतिनिधी असे धरुन आपण नउ सन्मा. सदस्यांची नियुक्ती केली. या समितीने एकंदर वर्षभर कामकाज केले. त्याचा आपल्याला अनुभव आहे. हयावर्षीसुध्दा ही महिला व बालकल्याण समिती एकमुखाने निवडावी अशी सत्ताधारी पक्षाची भुमिका आहे आणि गेल्या वर्षी जो पॅटर्न वापरला तोच पॅटर्न कायम ठेवावा अशीसुध्दा सत्ताधारी पक्षाची भुमिका आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की सभागृहनेते सभागृहाचे काम करतेवेळी आजूबाजूला बघतात की नाही हे माहिती पडत नाही. ते त्यांच्यापुरते बघतात असे स्पष्ट चित्र दिसत आहे. जर खरंच उदात्त मताने हे सभागृह चालवायचे असेल किंवा चालवतो असे लोकांना दाखवायचे असेल तर त्यातील जे खरे आहे ते बोलले पाहिजे. तुम्ही जर त्याच पॅटर्नवर असाल तर राष्ट्रवादीचे चार, काँग्रेसचे तीन, जनता दलाचा एक, शिवसेनेचा एक असे आम्हाला पुढचे बोलायची काही गरजच नाही. परंतु, अजून दोन अन्य पक्ष आहेत. हे त्यांना माहिती नसेल ते मोजत नाहीत असे मला वाटते.

**लिओ कोलासो :-**

दोन अन्य पक्षाबद्दल म्हणजे जे दोन विरोधी पक्ष आहेत. त्यांनी त्यांचे प्रतिनिधी आपापसात विचार करुन दिले तर तो प्रस्ताव आपल्यापुढे स्विकारण्यासारखा राहिल.

**रोहिदास पाटील :-**

खोडसाळ भुमिका घेण्यापेक्षा वास्तववादी भुमिका घेतलेली बरी. सभागृहनेते, गेल्या वर्षी महिला व बालकल्याण समितीमध्ये आमचे कोणीही नव्हते किंवा आघाडीचे कोणी नव्हते. त्यामुळे कुठे काय फरक पडला हे आम्हाला काही जाणवत नाही. परंतु, तुम्ही डायसवर अविश्वास टाकला. चेअरने जो न्याय दयायला पाहिजे होता. गेल्या वेळेच्या चेअरने जो न्याय दिला तो अत्यंत अपमानास्पद दिला असे आम्ही त्यावेळेलाही बोललो होतो. आजही तिच भूमिका असेल.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरसाहेब, माजी महापौर या ठिकाणी नाहीत. आपण त्यांच्यावर असे दोष लावणे योग्य होणार नाही म्हणून आमचा आक्षेप आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही त्यांच्यावर दोष लावतो अशातला भाग नाही. परंतु, त्या सभागृहातील एक पक्ष म्हणून आमचे वक्तव्य आहे. ते वक्तव्य प्रोसीडिंगला आलेले आहे. त्यामुळे त्यांच्या मागे बोलतो अशातला भाग नाही. जे बोलतो ते समोर बोलायची आमची सवय आहे. आम्हाला लपवून ठेवायची सवय नाही. त्यामुळे आताही सभागृहामध्ये तो महापौरांचा अधिकार आहे. त्यामुळे पक्ष सदस्यांचे संख्याबळ बघुन तुम्ही तसा निर्णय घ्यावा असे आम्ही म्हणतो.

**मा. महापौर :-**

मा. महिला व बालकल्याण समिती सदस्यांची एकमताने निवड करण्यासाठी ही सभा अर्धा तास तहकुब करण्यात येत आहे असे मी जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. १२.३० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**